## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०१/२०१७

**१) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक २१/०१/२०१७ चे १३.१५ वा. दर. यातील आरोपी हा मादक द्रव्याचे सेवन करुन त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच १२/ सी एम ३६२८ ही डोलतडोलत चालवीतांना मिळुन आल्याने वैद्यकीय अधिकरी यांचे कडुन तपासणी केली असता दारुचे नशेत असल्याचा अभिप्राय दिल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. भोंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भोंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**२) अंधारात आपले अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्‌देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दि. २१/०१/२०१७ चे ०४.०० वा. दर. यातील आरोपी हा चिरानंद गोथे यांचे घराजवळ अंधारात आपले अस्तित्व लपवुन दबा धरुन बसुन काहीतरी मालाविषयी गुन्हा करण्याचे उद्‌देशाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. पाटील यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १२२(क) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडव पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) विषप्राशन केल्याने महीलेचा मृत्यु . :—**

दिंनाक २१/०१/२०१७ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक सौ. वंदनाबाई रामचंद्र सतीमेश्राम वय ५५ वर्ष, रा. झिरोबा ही स्वत:चे राहते घरी विष प्राशन करुन मरण पावल्याने फिर्यादी रामचंद्र गंगाराम सतीमेश्राम वय ६६ वर्ष, रा. झिरोबा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

**४) सिमेंट कॉक्रेटचे काम करीत असतांना दगडावरुन पाय घसरुन डोक्याला मार लागल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक २०/०१/२०१७ रोजी १३.४० वा. दर. यातील मृतक दिलीप तुकाराम सोनवाने वय ३६ वर्ष, रा. चिखला हा आपले साथीदारासह चिखला माईन्स येथे सिमेंट कॉक्रेटचे काम करीत असतांना दगडावरुन पाय घसरुन खाली पडल्याने त्याचे डोक्याला मार लागुन जबर जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सु.बो. दवाखाना तुमसर येथे आनले असता डॉक्टराने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे गोबरवाही ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. दिवटे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.